N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** चाकुर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0575 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 17:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 14/10/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/10/2025
**Time From (वेळेपासून):** 14:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/10/2025 **Time (वेळ):** 16:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 017
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 16:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 17 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय नळेगाव ,चाकुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संतोश धनसिंग बर्गे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि लातुर ,लातुर,शिवाजी नगर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि लातुर ,लातुर,शिवाजी नगर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7744812535

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल रामषेट्टे | | | 1. नळेगाव ,नळेगाव,चाकुर,लातूर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 29/10/2025
फिर्याद

मी संतोष धनसिंग बर्गे वय 50 वर्शे, व्यवसाय - नोकरी, पद - पोलीस उपअधीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर, मो नंबर - 7744812535.
सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे 16 फेब्रुवारी 2024 पासून पोलीस उपअधीक्षक या पदावर कार्यरत आहे.

मी दि.09/10/2025 रोजी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. अनिस विखार अहमेद जहागिरदार, रा.नळेगाव ता. चाकूर यांनी ला.प्र.वि.लातूर कार्यालयात हजर येवून मला एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत तोंडी सांगितले. मी त्यांना दिनांक 10/10/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता षुगर केन मास्टर, साखर कारखाना, नळेगाव येथे येण्यास सांगितले व सापळा कारवाई करीता दोन षासकीय पंच उपलब्ध करून घेतले.

दिनांक 10/10/2025 रोजी 11.15 वाजता मी, पोलीस निरीक्षक जगदीष राऊत, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवुन षुगर केन मास्टर, साखर कारखाना, नळेगाव येथे पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हजर होते. मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सदरचे ईसम हे तक्रारदार असल्याचे सांगुन त्यास त्यांचे नाव, गाव व पत्ता विचारला असता तक्रारदार यांनी त्यांचे नांव अनिस विखार अहमेद जहागिरदार, वय 52 वर्शे व्यवसाय षेती रा. नळेगाव ता. चाकूर, जि.लातूर असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी तोंडी तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली की, "मी वरील ठिकाणचा राहणारा असून षेती व्यवसाय करून कुटंुबाची उपजिविका भागवतो.

मी दिनांक 15/04/2025 रोजी मौजे नळेगाव येथील गट नंबर 827/01 मधील 0 हेक्टर 10 आर जमीन श्री विकी दिलीप बेरकिले रा नळेगाव ता. चाकूर यांचेकडून खरेदीखत करून घेतली आहे व माझा भाऊ नफिस अहेमद विखार अहेमद जहागिरदार याने दिनांक 10/05/2025 रोजी मौजे नळेगाव येथील गट नंबर 827/1 मधील 0 हेक्टर 10 आर जमीन रईस अहेमद विखार अहेमद जहागिरदार (भाऊ) रा नळेगाव यांचेकडून कोर्ट डिक्री करून खरेदी केली आहे.

सदर खरेदीखत व कोर्ट डिक्रीचे आधारे माझे व माझे भावाचे नावे नमूद जमिनीची फेरफार नोंद करण्यासाठी मी दिनांक 12/09/2025 रोजी आमचे गावचे तलाठी श्री अमोल रामषेट्टे साहेब यांची त्यांचे नळेगाव येथील कार्यालयात जावून भेट घेवून विनंती केली. त्यावेळी तलाठी साहेब यांनी मी व माझे भावाने खरेदी केलेल्या जमिनीची फेरफार नोंद करण्यासाठी 35,000/- रूपयांची मागणी केल्यामुळे, मी व माझा भाऊ नफीस याने दिनांक 19/09/2025 रोजी फेरफार नोंद होणे करिता, तहसिल कार्यालय, चाकूर येथे अर्ज दिला होता. माझे कामासाठी कुठलिही षासकीय फीस लागत नाही. त्यामुळे तलाठी साहेब मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. परंतू मी तलाठी साहेब यांना लाच दिली नाही तर ते माझे काम करणार नाहीत या भितीपोटी मी त्यांना होकार देवून स्वमर्जिने तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 10/10/2025 रोजी तलाठी सज्जा, नळेगाव ता. चाकूर येथील कार्यालयात जावून तलाठी श्री अमोल रामषेट्टे साहेब यांची भेट घेवून त्यांचेकडे माझे कामासाठी बोलणी करणार आहे. सदर भेटीदरम्यान तलाठी साहेब यांनी स्वतः किंवा इतरमार्फत माझे कामाकरीता लाचेची मागणी करून ती स्वतः अथवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सदर कर्मचारी यांचेषी माझा कसलाही आर्थिक/पैषाचे

देवाण - घेवाणीचा व्यवहार झालेला नाही अथवा बाकी नाही. त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही.'' अषा आषयाची लेखी तक्रार दिली असुन सदर तक्रार वाचुन पाहुन मी व दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत.

लाच मागणी पडताळणी करण्यापुर्वी लोकसेवक तलाठी हे कार्यालयात हजर आहेत अगर कसे? याबाबत तक्रारदार यांनी माहिती घेतली असता मौजे नळेगाव येथील तलाठी हे अतिवृश्टीमुळे पिकाच्या झालेल्या नुकसानीच्या पाहणीमध्ये व्यस्त असल्याने ते दोन चार दिवस तलाठी कार्यालयात येणार नसल्याचे सांगितले आहे. त्यावरून पुढील सापळा कार्यवाही दिनांक 14/10/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले व तक्रारदार जहागिरदार यांना दिनांक 14/10/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता षुगर केन मास्टर, साखर कारखाना, नळेगाव येथे येण्याचे कळविण्यात आले होते.

दिनांक 14/10/2025 रोजी 12.30 वाजता मी, पोलीस निरीक्षक जगदीष राऊत, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवुन षुगर केन मास्टर, साखर कारखाना, नळेगाव येथे पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हजर होते. त्यानंतर लाच मागणी पडताळणी कारवाई अनुशंगाने तक्रारदार अनिस विखार अहमेद जहागिरदार यांचे वर नमुद केलेल्या कामासाठी लोकसेवक श्री अमोल रामषेट्टे, तलाठी, सज्जा नळेगाव, ता. चाकूर यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पंचासमक्ष षहानिषा करण्यासाठी लाचेच्या मागणीची पडताळणी करणे आवष्यक असल्याने सर्वानुमते पडताळणी करण्याचे ठरवून तक्रारदार अनिस विखार अहमेद जहागिरदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या मागणी संदर्भात काय बोलणी होते ते डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन मी दोन्ही पंचास व तक्रारदार यांना डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर बाबत सविस्तर माहीती दिली व नविन कोरे असलेले सिलबंद मेमरीकार्ड मी दोन्ही पंचासमक्ष फोडुन ते डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झाले नसले बाबत दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली.

लाच मागणी पडताळणी पुर्वी मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिल्यानंतर तक्रारदार अनिस जहागिरदार यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्याचे ठरवुन पो.अं.1488 जाधव यांचे मदतीने 14.10 वाजता डिजीटल व्हाॅइस रेकाॅर्डरचे बटन चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्र. 1 मोगरेकर यांच्या सोबत लोकसेवक अमोल रामषेट्टे यांची भेट घेण्यासाठी तलाठी सज्जा, नळेगाव येथे रवाना करून मी, पंच क्र. 02 व सापळा पथकातील ईतर सदस्य खाजगी वाहनामध्ये थांबुन राहीलो. त्यांनतर अंदाजे 14.35 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार अनिस जहागिरदार व पंच क्रमांक 1 मोगरेकर हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1488 जाधव यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केले. मी, पंच क्रं. 1 मोगरेकर यांना ते तक्रारदार यांचे सोबत लोकसेवक अमोल रामषेट्टे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय बोलणी झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार अनिस जहागिरदार असे मिळुन तलाठी सज्जा, नळेगाव येथे भेट घेण्याकरीता कार्यालयात गेलो असता, तेथे एक फिकट हिरव्या रंगाचा व चश्मा घातलेला व्यक्ती हे तलाठी अमोल रामषेट्टे असल्याचे तक्रारदार यांनी ईषाÚयाने मला सांगीतले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक अमोल रामषेट्टे यांच्यात कामाच्या व लाचेच्या अनुशंगाने चर्चा झाली तक्रारदार अनिस म्हणाले....नमस्ते सर..... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.. नमस्ते..... काय म्हणता?...त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....ते जमीन नावावर करायचं ते ... नफीस आणि अनिस..... ते तहसिलमधील अर्ज दिला होता मी.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....नाही आता तुम्ही तहसिलला अर्ज दिल्यावर हामी कसं करणार हाव ते..... तहसिलला एकदा पत्र दिल्यावर ... पुन्हा तहसिलदार विचारतय काय केलं त्याचं तहसिलदारला लेखी दिलावं..... साडेतीन लाख रूपये चलन लातुरला भरून घेतल्यानंतर करणे योग्य राहील म्हणून..... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....ऐ..... करा तसं काय बी नाही.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....रेट दुप्पट होतय बगा आता... पहिल्याच्या रेटमधी होत नाही.... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....किती करावं म्हणता? .... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....किती सांगितले होते तुम्हाला दोघामधी?... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले... पस्तीस हजार सांगितले होते.... मग त्यंनी किती भरावं.... द्यावावं अन आपून किती द्यावावं ... आम्ही दोघं बाजूला हावं.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....पंचवीस हजार बोललो होतो .. कोर्ट डिक्रीचे... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....काय तर तुमच्या हिषोबानं .. काय तर कमी करा सर... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.... पाचषे कमी द्या.... दोनो की पच्चीस पच्चीस ... म्हणावं...तुमचे पंधरा द्या..त्यांचे पंचवीस द्या..... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....माझे ... माझे काय तर कमी करा सर... माझे सदा.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....द्या काय देणारावं द्या... फटमन देवून मोकळं व्हा... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले.....मग तेच की.... म्हणजे किती? नफिसला किती? मला किती मला समजतय... आम्हाला म्हणजे.... मग त्यांना मागून घ्यायला येताव ओ...

नफिसला किती? मला किती सांगा म्हणजे मला.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....हजार रुपये कमी द्या ... अजून काय बोलू?...त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....म्हणजे आता.... किती म्हणजे काय समजना गेलय म्हणलं तर.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....तेचे पंचवीस द्या... तुमचे चैदा द्या बस... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....पंचीस न चैदा... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....एकोणचाळीस.... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....पहिले कमी सांगितले होते तुम्ही ... आता अजून.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....हजार कमी केलो.... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....पस्तीस सांगितले होते की?... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.... नाही... तवाचं गेलं आता... तहसिलला गेल्यावर त्यचा दंड लागल की कायतर...नाहीतर तिथल्या नियमाने करून घ्या..... आम्ही तहसिलला पत्र देताव...त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....अय... तिकडलं काय समजलालय.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले....उद्या द्या..... अं... मोबाईलवर मागून द्या न सदाजवळ द्या... त्यावर तक्रारदार अनिस म्हणाले....झाले तर आता आणतो.... नाही तर मग उद्या...असे म्हणून आम्ही तेथुन निघुन सापळा पथकाच्या वाहनाजवळ परत आलो." अषी हकीकत पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितली. मी, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी थोडया वेळा पुर्वी पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार अनिस जहागिरदार व लोकसेवक रामषेट्टे यांचे व्हाॅईस रेकाॅर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पो.अं.1488 जाधव यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले ते पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे मिळते जुळते असल्याचे दिसून आले. वरील झालेल्या संभाशणावरून लोकसेवक अमोल रामषेट्टे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष तक्रारदार यांचे भावाचे कामाचे 25,000/- रुपये व तक्रारदार यांचे कामाचे 15,000/- रुपये असे मिळून 40,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती तक्रारदार यांचे भावाचे कामाचे 25,000/- रुपये व तक्रारदार यांचे कामाचे 14,000/- रूपये असे एकूण 39,000/- रूपये रक्कम स्विकारणास सहमती दर्षविली व मागणी केलेली लाच रक्कम तलाठी कार्यालयात काम करणारा खाजगी व्यक्ती सदा यांचेकडे देण्यास सांगितली असल्याचे निश्पन्न झाले आहे.

त्यानंतर लोकसेवक अमोल रामषेट्टे यांनी मागणी केलेली 39,000/- रुपये लाचेची रक्कम सर्वानुमते देण्याचे ठरवुन आम्ही तक्रारदार अनिस जहागिरदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळवीले असता तक्रारदार यांनी त्यांचेजवळ सध्या फक्त 25,000/-रूपये असल्याचे सांगितले. त्यावरून लोकसेवक रामषेट्टे यांनी तक्रारदार यांचा भाऊ नफिस जहागिरदार यांचे कामासाठी मागणी केलेली 25,000/- रूपये रक्कम लोकसेवक अमोल रामषेट्टे यांना देण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांची पाहणी करता 25,000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा असल्याचे निदर्षनास आले. मी दिलेल्या सुचनेवरून लोकसेवक अमोल रामषेट्टे यांना द्यावयाचे 25,000/-रुपये (त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा) याची पाहणी केली व त्यांचे वर्णन नोंदविण्यात आले. वरील प्रमाणे नोटांचे वर्णन व क्रमांक यांची पडताळणी केल्यावर आम्ही अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे गुणधर्म दोन्ही पंच व तक्रारदार यांना समजावून सांगितले व प्रात्यक्षिक करून दाखविले. पो.अं./1759 कोंडरे यांनी लाच म्हणून दयावयाचे एकुण रक्कम 25,000/रुपयांना दोन्ही बाजूस एका कापसाचे बोळ्याने अॅन्थ्रासीन पावडर आडव्या व उभ्या पट्टयात लावली. मी सर्वांना सापळा कार्यवाही बाबत योग्य त्या सुचना दिल्या. माझ्या सुचनेवरून पो.अं.1488 जाधव यांनी 14.55 वाजता डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डचे बटन चालु करुन ते तक्रारदार यांच्या गळयात आडकावुन तक्रारदार जहागिरदार व पंच क्रमांक 1 मोगरेकर यांना लोकसेवक अमोल रामषेट्टे यांचे कार्यालयाकडे रवाना केले व त्यांचे पाठीमागे जावून मी, पंच क्रमांक 2 ईबितदार व सापळा पथकातील सदस्य असेे सर्वजण तलाठी यांचे कार्यालयाचे बाहेर त्यांचेवर लक्ष ठेवुन आम्ही लाच स्वीकृतीच्या ईषाÚयाची वाट पाहत थांबुन राहिलो.

त्यानंतर अंदाजे 15.48 वाजण्याचे सुमारास तक्रारदार अनिस जहागिरदार ब पंच क्रमांक 1 मोगरेकर हे सापळा पथकाजवळ आले. पो.अ./1488 जाधव यांनी तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर आपले ताब्यात घेवुन त्याचे बटन बंद केले. आम्ही पंच क्रमांक 1 मोगरेकर यांना विचारणा केली की, ते तक्रारदार जहागिरदार यांचेसोबत तलाठी कार्यालयातील खाजगी इसम सदा यांची भेट घेण्यासाठी गेल्यापासुन ते सापळा पथका जवळ परत येई पर्यंत तक्रारदार व खाजगी इसम सदा यांच्यात लाचेच्या देवाण घेवाणी बाबत काय बोलणे झाले? याबाबत विचारले असता पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितले की, " मी व तक्रारदार असे खाजगी इसम सदा यांची भेट घेण्याकरीता तलाठी कार्यालय, नळेगाव येथे गेलो असता तेथे तलाठी अमोल रामषेटे हे एकटेच होते. त्यावेळी तक्रारदार म्हणाले... ते माझ्यापषी नाहीत.... ते नफीसचे तेवढे आल्यात सर पैसे.... माझे नाहीत... नफीसचे तेवढे हे हायत...नफीसचे तेवढे घ्या.... त्यावर लोकसेवक रामषेटे म्हणाले...फोन करतो फोन केलं की या....त्यावर तक्रारदार म्हणाले... असं का?.. लोकसेवक रामषेटे म्हणाले... हं... नंबर सांगा तुमचा... त्यावर तक्रारदार यांनी तलाठी रामषेटे यांना त्यांचा मोबाईल नंबर दिला व म्हणाले.... आता काढून आणले भावाला पाठवून

दे म्हणलो.... लई दिवस झाले सर... येवढे करून द्या राव... ... त्यावर तलाठी रामषेटे म्हणाले... येस त्यावर तक्रारदार म्हणाले ... कवा येवू मग?... त्यावर तलाठी रामषेटे म्हणाले मी फोन करतो एक दहा मिनीटात.... असे म्हणुन तक्रारदार जहागिरदार व मी तलाठी रामषेटे यांचे फोनची वाट पाहत खाली चहाचे हाॅटेलवर थांबून राहिलो. काहीवेळाने तलाठी रामषेटे यांनी फोन न करता त्यांचे चारचाकी वाहन घेवून तेथुन निघून गेले. त्यानंतर आम्ही परत तलाठी कार्यालयात गेलो असता तलाठी कार्यालय बंद असलेले दिसल्याने आम्ही सापळा पथकाचे वाहनाजवळ परत आलो. अषी हकिकत पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितली. आम्ही तक्रारदार जहागिरदार यांना दोन्ही पंचासमक्ष विचारले असता, त्यांनी तक्रारदार जहागिरदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासह ला.प्र.वि. कार्यालय, लातूर येथे हजर आलो. आम्ही तक्रारदार जहागिरदार यांचेकडुन ताब्यात घेतलेला व्हाॅईस रेकाॅर्डर पो.अ./1488 जाधव यांचे मार्फतीने चालु करुन मेमरी कार्डमधील तक्रारदार व तलाठी रामषेटे यांचेत लाचेच्या देवाणघेवाणी संदर्भात झालेले संभाषण सर्वांनी ऐकले. नमूद संभाशणावरून तलाठी रामषेटे यांनी मागणी केलेली 39,000/-रुपये लाचेच्या रक्कमे पैकी 25,000/- रूपये रक्कम स्विकारली नाही. पुढील लाच स्वीकृती कार्यवाही तलाठी रामषेटे यांचे फोन आल्यानंतर करण्याचे ठरविण्यात आले व लाच स्वीकृती कार्यवाही स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक 15/10/2025 रोजी 11.30 वा. पुढील कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून खाजगी वाहन क्रमांक एम.एच. 24 ए.एस.2777 चालक विनोद जोगे असे रवाना होवुन षुगरकेन मास्टर, साखर कारखाना, नळेगाव रोड येथे पोहचलो. त्यानंतर सापळा कारवाई अनुशंगाने तक्रारदार अनिस जहागिरदार, तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम सदा यांचेत काय चर्चा होते ते डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन लाच मागणी पडताळणी व लाच स्वीकृती स्थगीती पंचनामा दरम्यान कागदी लिफाफ्यामध्ये सिलबंद केलेले डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर व लाच म्हणून द्यायची रक्कम पंचासमक्ष बाहेर काढण्यात आली. तलाठी अमोल रामषेटे यांनी मागणी केल्याप्रमाणे 39,000/- रूपये लाचेची रक्कम द्यावयाची असल्याने तक्रारदार जहागिरदार यांनी उर्वरीत 14,000/- रूपये रक्कम हजर केली. सदर रक्कमेस कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस एका कापसाचे बोळयाने अॅन्थ्रासीन पावडर आडव्या व उभ्या पट्टयात लावली. तक्रारदार यांनी दिनांक 14/10/2025 रोजी हजर केलेले 25,000/-रूपये व दिनांक 15/10/2025 रोजी हजर केलेले 14,000/- रूपये असे एकुण 39,000/- रूपये (ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 78 भारतीय चलनी नोटा) याची पाहणी करून त्याचे वर्णन व क्रमांक नोंदविण्यात आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पो.अं./1759 कोंडरे यांनी नमुद अॅन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम 39,000/- रुपये तक्रारदार यांच्या पॅंटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवली. आम्ही, तक्रारदार अनिस जहागिरदार, पंच आणि सापळा पथकातील सदस्य यांना सापळा कारवाई अनुशंगाने सुचना दिल्या

त्यानंतर आमचे सुचनेनुसार पो.अं./1488 जाधव यांनी 13.39 वा. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डचे बटन चालु करुन ते तक्रारदार अनिस जहागिरदार यांच्या गळयात आडकावुन तक्रारदार व पंच क्रमांक 1 मोगरेकर यांना तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम सदा यांचेकडे रवाना केले व मी, पंच क्रमांक 2 इबितदार व सापळा पथकातील सदस्य असेे सर्वजण त्यांचेवर लक्ष ठेवुन नळेगाव येथील तलाठी कार्यालयाचे खाली आडबाजूस लक्ष ठेवून लाच स्वीकृतीच्या ईषाÚयाची वाट पाहत थांबुन राहिलो. त्यानंतर अंदाजे 14.02 वाजण्याचे सुमारास तक्रारदार जहागिरदार व पंच क्रमांक 1 मोगरेकर हे सापळा पथकाजवळ आले. पो.अ./1488 जाधव यांनी तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर आपले ताब्यात घेवुन त्याचे बटन बंद केले. आम्ही पंच क्रमांक 1 मोगरेकर यांना विचारणा केली की, ते तक्रारदार जहागिरदार यांचेसोबत तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम सदा यांची भेट घेण्यासाठी गेल्यापासुन ते सापळा पथका जवळ परत येई पर्यंत तक्रारदार व तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम सदा यांच्यात लाचेच्या देवाण घेवाणी बाबत काय बोलणे झाले? याबाबत विचारले असता पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगीतले की, " मी व तक्रारदार जहागिरदार असे तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम सदा यांची भेट घेण्याकरीता तलाठी सज्जा नळेगाव येथे गेलो असता तेथे तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम सदा हे हजर नव्हते तेथील कार्यालयात काम करणारे खाजगी इसम राजू हे हजर होते. त्यावेळी तक्रारदार जहागिरदार म्हणाले... नमस्ते हायत का?.... त्यावर खाजगी इसम राजू म्हणाले... साहेब गेलेत... त्यावर तक्रारदार म्हणाले... कुठं? त्यावर खाजगी इसम राजू म्हणाले... लातुरला अर्जन्ट काम होत त्यांच... काहीतरी लातूरला गेलेत...एक काम करा.... नफिसची इथं एक सही.... रईस ... रईसची इथं एक सही...एवढया सहया आणा.... त्यावर तक्रारदार म्हणाले.... कवा येत्यात सर आता? फोन केलते त्यांनी या म्हणून ....मी गेलतो टॅक्टरचे भाड घेवून.....त्यावर खाजगी इसम राजू म्हणाले .. हं.... ठिक हय....केलते मी होतोच की इथं तवर...त्यावर तक्रारदार म्हणाले.... भाडयाचं सिझन चालू हाय आता... त्यावर खाजगी इसम राजू म्हणाले...राहू द्या आता...ते सहया आणून द्या...पुन्हा

हे करा...त्यावर तक्रारदार म्हणाले... मग सर आल्यावर फोन करा मला...मग आता हे...राजू हे आले तर फोन करा...मी तोपर्यंत सहया घेवून ठेवतो...नाहीतर मग उद्या फोन करा... आल्यावर....अं.... काय म्हणतावं...असे म्हणुन तक्रारदार जहागिरदार व मी सापळा पथकाचे जवळ आलो. अषी हकिकत पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितली. आम्ही तक्रारदार जहागिरदार यांना दोन्ही पंचासमक्ष विचारले असता तक्रारदार जहागिरदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालय,लातूर येथे परत आलो.

आम्ही तक्रारदार जहागिरदार यांचेकडुन ताब्यात घेतलेला व्हाॅईस रेकाॅर्डर पो.अ./1488 जाधव यांचे मार्फतीने चालु करुन मेमरी कार्डमधील तक्रारदार व खाजगी इसम राजू यांचेत लाचेच्या देवाणघेवाणी संदर्भात झालेले संभाषण सर्वानी ऐकले सदरचे व्हाॅईस रेकाॅर्डरमधील मेमरीकार्डमध्ये झालेले संभाषण वर नमुद प्रमाणे पंच क्रमांक 1 मोगरेकर व तक्रारदार जहागिरदार यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळतेजुळते असल्याचे दिसुन आले. वरील संभाशणावरून तलाठी कार्यालय, नळेगाव येथील तलाठी अमोल रामषेटे व खाजगी इसम हे हजर मिळून आले नाही. त्यामुळे लाच स्वीकृती सापळा कार्यवाही झालेली नाही. त्यावरून आम्ही तक्रारदार यांचेकडून लाच म्हणून द्यायची 39,000/-रूपये रक्कम हस्तगत करून एका कागदी लिफाफ्यामध्ये टाकुन दोन्ही पंचाचे स्वाक्षरीने सिलबंद करण्यात आली. सध्या दिपावली सणानिमीत्त षासकीय सुट्ट्याा असल्यामुळे पुढील लाच स्वीकृती सापळा कार्यवाही कार्यालयीन कामकाज सुरळीत चालू झाल्यानंतर करण्याचे ठरविण्यात आले व लाच स्वीकृती सापळा कार्यवाही स्थगीत करण्यात आलेली होती.

दिनांक 28/10/2025 रोजी 10.30 वाजता आम्ही, पोलीस निरीक्षक विषाल बहात्तरे, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य असे पुढील कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून खाजगी वाहन क्रमांक एम. एच.24 ए.एस.2777 चालक विनोद जोगे असे सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह रवाना होवुन षुगरकेन मास्टर, साखर कारखाना, नळेगाव रोड येथे पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हजर होते. त्यानंतर सापळा कारवाई अनुशंगाने तक्रारदार अनिस जहागिरदार व लोकसेवक अमोल रामषेट्टे व तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्ती सदा यांचेत काय चर्चा होते ते डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवून सापळा स्थगिती पंचनामा क्रमांक 1 दरम्यान कागदी लिफाफ्यामध्ये सिलबंद केलेले डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर व लाच म्हणून द्यायची रक्कम पंचासमक्ष बाहेर काढण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पो.अं.1759 कोंडरे यांनी अॅन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम 39,000/- रुपये तक्रारदार यांच्या पॅंटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवली. आम्ही, तक्रारदार जहागिरदार, पंच आणि सापळा पथकातील सदस्य यांना सापळा कारवाई अनुशंगाने सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेनुसार पो.अं.1488 जाधव यांनी 11.39 वा. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डचे बटन चालु करुन ते तक्रारदार जहागिरदार यांच्या गळयात आडकावुन तक्रारदार व पंच क्रमांक 1 मोगरेकर यांना लोकसेवक अमोल रामषेट्टे व तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्ती सदा यांचेकडे रवाना केले..आम्ही, पंच क्रमांक 2 ईबितदार व सापळा पथकातील सदस्य असेे सर्वजण त्यांचेवर लक्ष ठेवुन तलाठी कार्यालयाचे, जवळ लाच स्वीकृतीच्या ईषाÚयाची वाट पाहत थांबुन राहिलो.

त्यानंतर अंदाजे 12.51 वाजण्याचे सुमारास तक्रारदार जहागिरदार व पंच क्रमांक 1 मोगरेकर हे सापळा पथकाजवळ आले. पो.अ.1488 जाधव यांनी तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर आपले ताब्यात घेवुन त्याचे बटन बंद केले. आम्ही पंच क्रमांक 1 मोगरेकर यांना विचारणा केली की, ते तक्रारदार जहागिरदार यांचेसोबत लोकसेवक अमोल रामषेट्टे व तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्ती सदा यांची भेट घेण्यासाठी गेल्यापासुन ते सापळा पथका जवळ परत येई पर्यंत तक्रारदार व लोकसेवक अमोल रामषेट्टे व तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्ती सदा यांच्यात लाचेच्या देवाण घेवाणी बाबत काय बोलणे झाले? याबाबत विचारले असता पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगीतले की, " मी व तक्रारदार असे लोकसेवक अमोल रामषेट्टे व तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्ती सदा यांची भेट घेण्याकरीता तलाठी कार्यालय, नळेगाव येथे गेलो तेथे लोकसेवक अमोल रामषेट्टे यांची भेट झाली त्यावेळी तक्रारदार जहागिरदार म्हणाले....नमस्ते.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले... क्या चल रहा है सेठ...? त्यावर तक्रारदार म्हणाले... ही नोटीस सर ही सह्याा केलेली... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले... राजू ही संचिकेला लावून ठेव नंतर... राहू द्या माझ्याकडे..... सदू सातबारा काढ ... नफिसचं नं... त्यावर तक्रारदार म्हणाले... एकचं येतय दोघाचंबी काढलं तर.... एकच नाव येतय सातबाÚयावर दोघांचबी ... आठषे सत्तावीस.... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले...पस्तीस रूपये कॅष हाय ना... सह्याा करा इथं... त्यावर तक्रारदार म्हणाले ... इथंच मारायची का? इथंच मारायची का?... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले... कषावर .. नाही ती तुमची काॅपी हाय... पस्तीस रूपये द्या मला...त्यावर तक्रारदार म्हणाले ... हं.... हे झालेलं हाय... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.. भरती पस्तीस आणलाव... त्यावर तक्रारदार म्हणाले . चिल्लर होती ती... पस्तीस द्या म्हणलो.. पस्तीस

दिले... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.. बसा आता एक दोन मिनीट.... त्यावर तक्रारदार म्हणाले.... हे तुमचे पैसे?आणलो होतो...एकोणचाळीस हजार रूपये... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले...नाही...हेच सांगीतलो होतो की... तुम्हाला पस्तीस रूपये... दुसरे कोणते ?अय.... नाही... येड लागलं का? त्यावर तक्रारदार म्हणाले... अय.. म्हणलो होतो की साहेब तुम्ही....त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले..घेतलो की पस्तीस रूपये तुमचे...अजून किती लागणारेत.... पस्तीसच होते....त्यावर तक्रारदार म्हणाले .... तुम्ही म्हणलो होतो की तुम्ही... एकोणचाळीस हजार रूपये... त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.. अय नाही... कवा?...गैरसमज झाला काय तुमचा?...त्यावर तक्रारदार म्हणाले ....अय काही बी नाही....त्यावर लोकसेवक रामषेट्टे म्हणाले.. चालतय या.... त्यावर तक्रारदार म्हणाले झालं जावू का सर मग? असे म्हणुन तक्रारदार जहागिरदार व मी सापळा पथकाचे जवळ आलो. अषी हकिकत पंच क्रमांक 1 मोगरेकर यांनी सांगितली.

आम्ही तक्रारदार जहागिरदार यांना दोन्ही पंचासमक्ष विचारले असता तक्रारदार जहागिरदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 1.मोगरेकर यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही तक्रारदार जहागिरदार यांचेकडुन ताब्यात घेतलेला व्हाॅईस रेकाॅर्डर पो.अ./1488 जाधव यांचे मार्फतीने चालू करुन मेमरी कार्डमधील लोकसेवक अमोल रामषेट्टे व तक्रारदार यांचेत लाचेच्या देवाणघेवाणी संदर्भात झालेले संभाषण सर्वानी ऐकले सदरचे व्हाॅईस रेकाॅर्डरमधील मेमरीकार्डमध्ये झालेले संभाषण वर नमुद प्रमाणे पंच क्रमांक 1 मोगरेकर व तक्रारदार यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळतेजुळते असल्याचे दिसुन आले.वरील संभाशणावरून लोकसेवक अमोल रामषेट्टे यांनी मागणी केलेली 39,000/- रूपये लाचेची रक्कम तलाठी अमोल रामषेट्टे व तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्ती सदा यांनी स्विकारली नाही. त्यावर तक्रारदार जहागिरदार यांनी सांगितले की, तलाठी अमोल रामषेट्टे यांना माझ्यावर संषय आल्याने ते किंवा खाजगी इसम सदा हे माझ्याकडून लाच रक्कम स्विकारणार नाहीत. त्यामुळे पुढील लाच स्विकृती कार्यवाही होईल याची षक्यता नाही. तसेच सदरची सापळा कारवाई बंद करून पुढील कायदेषीर कारवाई करावी असे पंचासमक्ष सांगितले. त्यामुळे पुढील सापळा कार्यवाही बंद करण्यात आली होती.

तरी यातील लोकसेवक अमोल रामषेट्टे, पद- ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), नेमणुक तलाठी कार्यालय, नळेगाव ता.चाकूर जि. लातूर यांनी तक्रारदार अनिस जहागिरदार व त्यांचा भाऊ नफिस जहागिरदार यांनी मौजे नळेगाव येथील गट नंबर 827/01 मधील खरेदी केलेली अनुक्रमे 0 हेक्टर 10 आर जमिनीची फेरफार नोंद करण्याकरिता म्हणून दिनांक 14/10/2025 रोजी 14.24 वाजता पंचासमक्ष तलाठी कार्यालय, नळेगाव येथे 40,000/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 39,000/- रूपये लाच रक्कम स्विकारणास सहमती दर्षविली व सदर लाच रक्कम तलाठी कार्यालयात काम करणारा खाजगी व्यक्ती सदा यांचेकडे देण्यास सांगितली होती. लोकसेवक अमोल रामषेट्टे व खाजगी व्यक्ती सदा यांचे विरूध्द दिनांक 14/10/2025, दिनांक 15/10/2025 व दिनांक 28/10/025 रोजी लाचेची सापळा कारवाई आजमावली असता, लोकसेवक अमोल रामषेट्टे यांना तक्रारदार यांचा संषय आल्याने त्यांनी व खाजगी व्यक्ती सदा याने लाच रक्कम स्विकारली नाही.

म्हणुन माझी लोकसेवक अमोल रामषेट्टे, पद- ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), तलाठी कार्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर यांच्या विरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकार तर्फे फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BALAJI RAMRAO BHANDE(I (Inspector)) / POBN84557 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी),

**Name** (नाव): BALAJI RAMRAO BHA

**Rank**(पद): I (inspector)

**No.**(सं.): POBN84557

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन,चाकूर